Review Of Research
Vol. 3 | Issue.4 | Jan.2014
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# संताजी घोरपडे यांच्या पतन व हत्येतील धनाजी जाधवांचा सहभाग ? :- एक मिमांसा

डॉ. डी. एस. कडव

**सारांश :**

संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे दोघेही मराठ्यांचे समकालीन सेनानी होते. दोन्ही सेनानींचा उदय एकाच कालखंडात झाला. दोघांनीही मराठ्यांच्या मोगलांविरुद्धच्या स्वातंत्र्य लढ्यात समान कामगिरी बजावली. दोन्ही सेनांनीबद्दल मोगलांच्या मनात समान दहशत व भीती निर्माण झाली होती. दोघांच्या कामगिरीमुळेच मराठे - मोगल संघर्षाचा प्रवाह बदलून मोगलांच्या विजयी वाटचालीचे रुपांतर अपयशात व मराठ्यांच्या विजयाचा मार्ग प्रशस्त होण्यात झाले.

पण असे होत असतांनाच दुर्दैवाने राजाराम महाराज व संताजी घोरपडे यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले. राजाराम महाराजांनी संताजीचे सेनापती पद काढून ते धनाजी जाधव यांना दिले. इतकेच नव्हे तर संताजीच्या विरोधात स्वत: तसेच नंतर धनाजी जाधवांच्या नेतृत्वाखाली लष्करी मोहीम काढली यामुळे राजाराम महाराज व संताजी त्याचप्रमाणे धनाजी व संताजी यांच्यात उघड युद्ध झाले, ज्याचा परिणाम संताजीच्या पतनात झाला. दहेगावच्या युद्धातील पराभवा नंतर मोगलांचा कर्दनकाळ ठरलेल्या व निष्णात समजल्या जाणाऱ्या संताजीला विपन्नावस्थेत फिरावे लागले. अशा विपन्नावस्थेतच संताजींचा शिरच्छेद करण्यात आला. अशाप्रकारे एका निष्णात सेनानींचा आणीबाणीच्या काळात दुर्दैवी अंत होणे संताजीच्या जिवनातीलच नव्हे तर मराठ्यांच्या इतिहासातील शोकांतिका ठरली. संताजीच्या झालेल्या अचानक पतना करिता व हत्ये करिता नेमके कोण जबाबदार होते व त्यामध्ये धनाजी जाधवांचा सहभाग होता का ? यावर प्रकाश टाकून सत्य शोधण्याचा प्रयत्न सदर शोध निबंधाचे माध्यमातून केला आहे.

**विवरण :**

**संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठा राज्यात न भूतो न भविष्यती अशी परिस्तिथीती अस्तित्वात आली होती. औरंगजेब बादशाहने सर्व सामर्थ्यानिशी मराठा स्वराज्य नष्ट करण्याच्या इरादयाने आक्रमण सुरु केले होते. मराठा राज्याची राजधानी असलेल्या रायगडच्या किल्ल्याला वेढा दिला. तो किल्ला अधिक काळ लढविणे शक्य नसल्याची जाणीव होताच राजाराम महाराज बाहेर पडून जिंजीला गेले. जिंजीच्या किल्ल्यालाही मोगल सैन्यांनी वेढा दिला. त्यामुळे राजाराम महाराज व त्याचे कुटुंबीय असुरक्षित बनल्यामुळे रामचंद्र पंत अमात्यांनी संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांना महाराजांच्या मदती करिता कर्नाटकात पाठविले. संताजी व धनाजी यांनी समन्वय व सहकार्याने योजना आखून मोगलांविरुद्ध प्रती आक्रमणे सुरु केली. संताजी घोरपडे यांनी खुद्द औरंगजेब बादशहाच्या छावणीवर हल्ला करून त्या छावणीचे कळस कापून आणले. या पराक्रमाबद्दल राजाराम महाराजांनी संताजीचा गौरवच केला नाही तर अनेक वर्षापासून रिक्त असल्येल्या सेनापती पदावर संताजीची नेमणूक केली. वास्तविकतः सेनापती पदावर धनाजी जाधवांची नेमणूक करण्याचा मानस राजाराम महाराजांचा होता. पण रामचंद्र पंतांच्या सल्ल्या प्रमाणे त्या पदावर संताजींची नेमणूक केली.[१]**

**मात्र मोगल सेनापती जुल्फिकारखान याला सुखरूपणे लष्करासह वान्दिवाशपर्यंत परत जाऊ दिल्याच्या राजाराम महाराजांच्या निर्णयाचा संताजीने उघड विरोध केला. तसेच संताजी भर दरबारातून बाहेर पडून दुसरीकडे छावणी करून राहू लागले यामुळे संताजी व राजाराम महाराजांच्या संबंधात दुरावा निर्माण झाला. असे असतांनाच बहिर्जी घोरपडे व याचप्पा नायक यांनी मार्च १६९३ मध्ये बंडखोरी केली. या बंडखोरांना संताजी घोरपडेची चिथावणी असल्याचा संशय राजाराम महाराजांना आला. त्यामुळे त्यांनी संताजीला जाब विचारला. [२] यावरून राजाराम महाराज व संताजी यांच्यात पुन्हा भांडण झाले. या भांडणानंतर संताजी हे महाराजांची परवानगी न घेता महाराष्ट्रात परत गेले. संताजीची ही कृती अयोग्य असल्याकारणाने महाराजांनी संताजीचे सेनापती पद काढून घेतले व ते धनाजी जाधव याला दिले. पण मराठा मोगल संघर्षाची एकूण स्थिती लक्षात घेता संताजी सारखा सेनानी नाराज होणे व मुख्य म्हणजे मराठा मंडळात दुही दिसणे हितावह नसल्याची जाणीव झाल्यामुळे संताजींची समजूत काढून सेनापती पद पुन्हा त्यांना बहाल करण्यात आले.[३]**

**यांनतर संताजी व धनाजींनी संयुक्त मोहीमा काढल्या. सन १६९४ च्या शेवटी जुल्फिकारखानाने पुन्हा जिंजीला वेढा दिल्याची वार्ता कळताच डिसेंबर १६९५ च्या शेवटी**

**संताजी व धनाजी सैन्यासह तिकडे गेले. पण मराठा सैन्यासमोर आपला निभाव लागणे शक्य नसल्याची जाणीव झाल्यामुळे जुल्फिकारखानाने बहुतेक ठाणी सोडून दिली[४] मार्च १६९६ मध्ये तर ८ मे १६९६ रोजी संताजी जिंजीला आले.**

**धनाजी व संताजी जिंजीला आले असता मोगलांविरुद्ध यशस्वी संघर्ष केल्याबद्दल राजाराम महाराजांनी दोन्ही सेनानींचा सन्मान केला. विशेषतः धनाजी जाधवांना सेनापती समान मान दिला तसेच हुकुम गाजविण्याचा हक्कही दिला[५] मात्र यावेळीही पुन्हा संताजी व राजाराम महाराज यांच्यात वाद निर्माण झाला. या वादानंतर संताजी रागाने सैन्यासह जिंजी सोडून निघून गेले. याविषयी सरदेसाई लिहितात " कासीमखान व हिम्मतखान या दोघांचा पाडाव करून संताजीने जो अपूर्व विजय सम्पादन केला होता, त्याबद्दल त्यास योग्य प्रोत्साहन राजारामाने दिले नाही आणि धनाजींचा गौरव केला. हा अपमान संताजीला सहन झाला नाही. उलट त्यांच्या दांडगाईबद्दल त्यांचे सेनापतीपद काढून त्याला शासन करण्याचा हुकुम राजारामाने धनाजीस दिला"[६] तर अ. रा. कुळकर्णी व ग. ह. खरे लिहितात " कासीमखान, खानहजाहाखान व हिम्मतखान बहादूर यांच्या विरुद्ध दैदिप्यमान विजय मिळवून सरसेनापती संताजी घोरपडे मार्च एप्रिल १६९६ मध्ये राजाराम महाराजांच्या दर्शनास जिंजी येथे गेले. तेथे त्या दोघात खटका उडाला. त्या खटक्याचे कारण राजारामांनी मोगलांकडून स्वराज्यात आलेल्या मराठा सरदारास जी मोठ्या मानाची वागणूक, पुष्कळ वतणे व लष्करी मानमरातब अदा करून दिली हे होय."[७]**

**इंग्रजांच्या नोंदीनुसार " मराठ्यांच्या छावणीतील आमच्या हेरांकडून आणि इतर अनेक विश्वसनीय गोटातून आम्हास संताजी घोरपडे व त्याचा बंधू बहिर्जी घोरपडे यांच्या बेशिस्त वर्तनाबद्दल निश्चित स्वरुपाची बातमी समजली आहे. त्यांच्या या वर्तनामुळे (जिंजीतील) मराठा सरदारात मोठा असंतोष निर्माण झालेला आहे....."[८]**

**अशाप्रकारे संताजी घोरपडे हे राजाराम महाराजांशी भांडून पूर्व परवानगी शिवाय निघून गेल्यामुळे महाराजांनी संताजींचे सेनापती पद कडून ते धनाजींना दिले[९] यावेळी संताजीकडे वीस हजाराहून अधिक फौज होती इतकी फौज बंडखोराकडे असणे धोकादायक होते. त्यामुळे राजाराम महाराजांनी संताजीच्या पारीपत्याचा निश्चय करून ते स्वत: धनाजी जाधव , अमृतराव निंबाळकर व हनुमंतराव घोरपडे यांच्या सह संताजीच्या पारिपत्यासाठी रवाना झाले.[१०] भीमसेन सक्सेना लिहितो कि " संताजी हा स्वतंत्र होण्याच्या मार्गावर आहे, असे धनाजीने राजाराम महाराजांना भासविले आणि त्याच्याशी लढून त्यास ठार मारण्याची युक्ती त्यांना त्याने सांगितली.[११]**

**तर सेतू माधवराव पगडी याविषयीची हकीकत देतांना म्हणतात. " स्वत: राजाराम महाराज धनाजी जाधव, अमृतराव निंबाळकर व हणमंतराव घोरपडे हे संताजीव्रर चालून**

**गेले. त्यांच्यात कांचीपूरम जवळील आयेवारकुटी येथे लढाई झाली. त्यात राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखालील फौजेचा पराभव होऊन राजाराम महाराजांना कैद व्हावे लागले तर धनाजी जाधव रंणागणावरून पळून गेले. मात्र अमृतराव निंबाळकर पकडला जाऊन संताजीने त्याला हत्तीच्या पायाखाली देऊन ठार मारले. दुसरे दिवशी स्वतः संताजी आपले हात बांधून राजाराम महाराजांसमोर उभे राहिले. आपल्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल क्षमायाचना करीत ते म्हणाले " मी तुमचा सेवक आहे. तुम्ही धनाजीला माझ्या बरोबरीचा दर्जा देऊ इच्छित होता..... म्हणून मला असे उद्धटपणे वागणे भाग पडले. आपण आता जी आज्ञा कराल त्याप्रमाणे मी वागेन."[१२]**

**तर भीमसेन सक्सेना हा आपल्या ग्रंथात लिहितो. " राजाराम व धनाजीचे बरेच मोठे सैन्य संताजीवर तुटून पडले. त्यांच्या सैन्याच्या आघाडीवर अमृतराव निंबाळकर हा सेनानी होता. पण युद्धात अमृतराव हा संताजीच्या सैनिकांच्या हातून मारल्या गेला उभय पक्षाचे वैमनस्य चालूच राहिले. राजाराम आणि धनाजी हे जिंजीच्या किल्ल्यात परतले. संताजी आपल्या देशाकडे परतला."[१३] या घटनेची नोंद जेधे शकावलीमध्ये केलेली आहे त्यानुसार " चैत्र मासी राजारामाच्या दर्शनास संताजी घोरपडे चंदीस (जिंजीस ) गेले. जेष्ट मासी ( मे - जून ) कची अलीकडेस जाले. धनाजी जाधव पलोन देशास आला. अमृतराव निंबाळकर पडिला संताजीची फत्ते जाली."[१४]**

**अशाप्रकारे राजाराम महाराजांच्या उपस्थितीत संताजी घोरपडेच्या विरोधात जी लष्करी मोहीम काढली, त्यावेळी झालेल्या संघर्षात संताजीला विजय प्राप्त होऊन अमृतराव निंबाळकर मारल्या गेला तर राजाराम महाराजांना संताजीने कैद केले. याविषयी डॉ. जासिंगराव पवार लिहितात "छत्रपती समोर माफी मागून संताजीने त्यांना मुक्त केले आणि जिंजीच्या किल्ल्यात सुखरुपपणे पोहचविण्याची व्यवस्था केली.....[१५] तर सुरतकर इंग्रज लिहितात " Rama Rajah is surprised by one of his Captains Santo Ghorpura and taken prisoner. It is said he designed to serve the Raja so; and they report likewise.....[१६]**

**यांनतर राजाराम महाराजांनी संताजीचे लष्करी बळ कमीकरण्यासाठी त्यांच्याकडील अनेक सरदारांना सैन्यासह आपल्याकडे बोलावून घेतले २७/१०/१६९६ ला रामचंद्र पंतांना लिहिलेल्या पत्रात राजाराम महाराज नमूद करतात " संताजी घोरपडे यांनी स्वामींच्या पायांशी हरामखोरी केली. याकरिता त्यांस सेनापती पदाचा कार्यभार होता तो दूर करून फौज हुजूर आणविली"[१७] त्यांनतर राजाराम महाराजांनी संताजीला पकडून आणण्याची आज्ञा धनाजींना दिली.[१८] संताजीला याची वार्ता काढताच ते कर्नाटकातून महाराष्ट्राकडे परत निघाले. हणमंतराव निंबाळकर व धनाजी जाधव यांनी संताजीचा पाठलाग सुरु केला**

हणमंतरावाला धनाजीने संताजीवर हल्ला करण्यासाठी पुढे केले. यावेळी झालेल्या लढाईचे वर्णन करतांना खाफीखान म्हणतो " हनमंतराव नावाचा एक प्रसिद्ध सरदार होता. त्याला धनाजीने इशारा दिला. संताजीचे सरदार धनाजीला मिळाले होतेच. हणमंतरावाने धनाजींच्या सुचणेप्रमाणे संताजीवर हल्ला केला. धनाजीची फौजही त्याच्याबरोबर होती. संताजीची फौज मोडली.....संताजी असहाय होऊन डोंगराळ भागात असलेल्या आपल्या घराकडे निघाला."[१९]

जरी संताजीचा पराभव झाला असला तरी धनाजींनी संताजीचा पाठलाग करणे सोडले नव्हते तर दुसरीकडे औरंगजेबाने गजिउदद्दीनखान व फिरोज जंग यांनाही संताजींची कोंडी करण्यास पाठविले. याविषयी खाफीखान लिहितो " एकीकडून बादशाही फौज आणि दुसरीकडून धनाजी जाधवांची फौज याप्रमाणे त्या सावजाला मृत्यूच्या जाळयात पकडण्यात आले. संताजीची फौज मोडली. त्याची व त्याच्या सैन्याची फारकत झाली."[२०] सातान्याच्या भागात संताजी व धनाजी यांच्यात अनेक चकमकी घडून आल्या साकी मुस्तैद्खान म्हणतो " त्या भागात संताजी व धनाजींची गाठ पडून अनेक संघर्ष झाले....संताजीचा प्रचंड पराजय झाला. काही निवडक लोकांसह तो विपन्नावस्थेत पळाला."[२१] तर सरदेसाई यांच्या मतानुसार "संताजींशी अखेरची लढाई सातान्याच्या प्रदेशातील दहीगाव जवळ झाली."[२२]

वारीलप्रमाणे विपन्नावस्थेत असतांना थकून एका ओढ्यावर स्नान करीत असतांना नागोजी मानेच्या मारेकऱ्यांनी संताजींचा शिरच्छेद केला. तसेच संताजीचे कापलेले डोके नागोजी मानेने औरंगजेब बादशहा कडे नेले. याविषयी मान्यवर इतिहासकरांनी विभिन्न विधाने केली असली तरी, नागोजी मानेनी संताजीची हत्या केल्याचे एकमत आहे. जरी नागोजी माने हा काही काळ राजाराम महाराजांच्या सेवेत असला तरी संताजीच्या हत्याचे वेळी त्याने महारजांच्या सेवेचा त्याग केला होता व तो मोगलांच्या सेवेत जाण्याच्या प्रयत्नात होता. याचाच एक भाग म्हणून औरंगजेब बादशाहाला खुश करण्यासाठी त्याने संताजीचे शीर बादशाहाकडे नेले असावे.[२३]

डॉ. जयसिंगराव पवार यांनी नागोजी माने याच्या नावाने बादशहाचा कौलनामा उधृत केला आहे त्यानुसार " तुम्ही दरबाराची सेवा करण्यासाठी शत्रूकडून (मराठ्यांकडून) निघाला व संताजीच्या पळून जाण्याबाबत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याबाबत तुमच्यासाठी फर्मान पाठवून व गुन्ह्याची क्षमा करून तुमच्या मागण्या हुजूर पाठविल्या तेव्हा तुम्ही रणदुल्लाखानाच्या ( म्हसवडचा ठाणेदार ) फौजेत जाऊन मिळावे व नंतर तुम्हाला तुमचे गुन्हे माफ केल्याचे फर्मान व मागण्या व इनाम वगैरे लिहिल्याप्रमाणे दिले जाईल. यातच तुमचे कल्याण उत्कर्ष आहे व त्याचप्रमाणे तुम्ही वागावे. तुमच्या प्राणापलीकडील निष्ठेबद्दल योग्य ते चीज होईल." पवार पुढे म्हणतात " नागोजी मानेला संताजीची हत्या झाली त्यावेळेपर्यंत मोगली मनसब मिळाली नव्हती ती तो मोगलांना मिळाल्यातच जमा

**होता."[२४] तर जेधे शकावली प्रमाणे " नागोजी माने याने संताजीला आषाढ मासी मारले.''[२५]**

**पण सेतू माधवराव पगडी खाफिखानाचा संदर्भ देवून लिहितात " संताजी व नागोजी माने यांच्यात भयंकर हाड वैर होते.... त्याने (नागोजीने) गाफील संताजीवर हल्ला करून त्याला ठार मारले आणि त्यांचे डोके कापून एका तोबऱ्यात घातले. त्याने तो तोबरा घोड्याला बांधला. आपल्या बायकोपाशी किंवा काहींच्या मते धनाजी जाधवापाशी तो ते डोके घेऊन निघाला. वाटेत तो तोबरा निसटून जमिनीवर पडला....लुत्फुल्लाखान याने संताजीचे डोके फिरोजजंगाकडे आणले, नंतर ख्वाजाबाबा तुरानी याज बरोबर संताजीचे डोके बादशाहाकडे पाठविण्यात आले....या प्रकरणाबद्दल इतरही काही आख्यायिका आहेत, खरे काय ते परमेश्वर जाणे."[२६]**

**निष्कर्ष :**

**अशापप्रकारे संताजी घोरपडे यांचे पतन व हत्या दोन्ही घटना मराठ्यांच्या इतिहासाला काळीमा फासणाऱ्या निश्चितच ठरल्या. पण या दोन्ही करिता संताजी घोरपडे स्वत:, त्यांचा स्वभाव, कार्यशैली बऱ्याच प्रमाणात कारणीभूत होती हे वरील विवरणावरून स्पष्ट होते.**

**धनाजी जाधवांच्या सहभागाबद्दल बोलायचे झाल्यास तत्कालीन कागदपत्रे, पत्रव्यवहार, मान्यवर इतिहासकार व संशोधकाच्या संशोधनातून संताजीच्या पतन व हत्येत धनाजींचा सक्रीय सहभाग असल्याचा निष्कर्ष निघालेला नाही. निश्चितच भीमसेन सक्सेना यांनी " संताजी स्वतंत्र होण्याच्या मार्गावर असून त्याला संपविले पाहिजे असे धनाजी जाधवांनी राजाराम महाराजांना सांगितल्याचे नमूद केले आहे. याचा अर्थ संताजीची हत्या करावी यासाठी धनाजींनी प्रयत्न केला असा होत नाही. जो सेनानी वारंवार राज्यप्रमुखा विरुद्ध बंडखोरी करतो, राज्यप्रमुखाला आव्हानच देत नाही तर कैद करण्यापर्यंत मजल मारतो हि बाब राज्यहितासाठी व भवितव्याच्या दृष्टीने निश्चितच हितावह नव्हती. याचे अत्यंत प्रतिकूल परिणाम मोगलांविरुद्धच्या मराठ्यांच्या प्रतीकारावर होऊ शकत होता. यावेळी मोगलांशी मराठ्यांचा जीवन मरणाचा संघर्ष सुरू होता संताजीची बंडखोरी मोगलांचा आत्मविश्वास वाढविण्यास साह्यभूत ठरणारी होती. मुख्य म्हणजे इतर सरदार व दरबार मंडळी ही संताजीचे अनुकरण करू शकत होती. यासाठी संताजीची बंडखोरी त्वरित दडपून टाकणे गरजेचे बनले होते. यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर हाच पर्याय होता. कारण यापूर्वी संताजीची समजूत सामोपचाराच्या मार्गाने काढण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले होते. मुख्य म्हणजे संताजी स्वत: निष्णात व रणकुशल सेनानी होते व तेच त्याचे**

सामर्थ्यही होते. त्यामुळे त्याचा निपटारा लष्करी बळाचा वापर करूनच करणे शक्य होते. एकंदरीत संताजींची बंडखोरी दडपून टाकणे व त्यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर हाच पर्याय राजाराम महाराजांकडे होता, तो त्यांनी निवडला. ही जबाबदारी सेनापती या नात्याने स्वभाविकरित्या धनाजी जाधवांना पार पडावयाची होती. ती त्यांनी पार पडली.

मात्र असे करत असतांना संताजी घोरपडे यांनी अनेकदा धनाजी जाधवांचा केलेला अपमान व पानउतारा याचे स्मरण धनाजींना झाले असणारच. त्यामुळे संताजीबद्दल धनाजींची भूमिका अधिक कठोर बनली असणार. या भुमीकेमुळेच संताजीना नष्ट करून कायमची डोकेदुखी संपविण्याचा विचार धनाजींनी केला असणार व तसे त्यांनी राजाराम महाराजांना सांगितले असणार. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता धनाजीची भूमिका गैर वाटत नाही. शेवटी लष्करी संघर्षात विरोधकांना नष्ट करणे हे संघर्षरत पक्षाचे, नेतृत्वाचे ध्येय असतेच. धनाजी त्याला अपवाद नव्हते. राजाराम महाराजांनी धनाजींच्या कृतीचा विरोध केला नाही किंवा त्यांना रोखले नाही यावरून धनाजीच्या भूमिकेला महाराजांची संमती होती, किंबहुना पूर्व इतिहास बघता राजाराम महाराजांनाही संताजींचा कायम स्वरूपी बंदोबस्त हवा होता असे म्हणण्यास जागा आहे. त्यामुळे संताजी घोरपडे यांच्या पतनात धनाजींचा प्रत्यक्ष सहभाग व जाणीवपूर्वक प्रयत्न होते असा निष्कर्ष काढणे अन्यायकारक ठरेल. संताजी स्वत:च त्याच्या पतनाकरिता जबाबदार होते.

तसेच संताजींची जी हत्या झाली ती होण्याकरिता संताजी व नागोजी माने यांच्यातील शत्रुत्व कारणीभूत होते. संताजीच्या हत्येत इतर कोणाचाही हात व प्रोत्साहन असल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. कोणत्याही इतिहासकाराने याबद्दल धनाजींना दोष दिलेला नाही. खाफिखानाच्या नोंदी मध्ये “ संताजीचे डोके धनाजीकडे घेऊन जाणार होता ” असा उल्लेख असला तरी “ काहींच्या म्हणण्याप्रमाणे ” असे विधान केल्याचेही नमूद आहे. त्याबद्दल खुद्द खाफिखानालाही खात्री नाही. त्याची माहिती ऐकीव असावी.

कदाचित धनाजींना खुश करण्यासाठी संताजींचे डोके त्यांच्याकडे नेण्याचा विचार नागोजी मानेच्या मनात आला असावा. पण नागोजी मानेचा कल यावेळी पूर्णपणे मोगलांच्या सेवेत जाण्याकडे होता. तसे व्हावे म्हणून बादशाहाला व मोगल सेनांनीना खुष करण्यासाठी नागोजीने संताजीचे डोके बादशहाकडे पाठवून स्वत:ची निष्ठा व्यक्त केली असावी. एकंदरीत वरील सर्व विवरण, मान्यवर इतिहासकारांची विधाने, लिखाण मुख्य म्हणजे धनाजी जाधवांचा स्वभाव व शत्रूप्रतीची त्यांचो वागणूक लक्षात घेता संताजींची हत्या करण्यासारखे हिनकृत्य धनाजींकडून होणे शक्य वाटत नाही. हे सर्व प्रतिबिंबित करण्यासाठीच सदर शोध निबंध प्रस्तुत आहे.

**तळटटिपा :**

१ पवार जयसिंगराव – सेनापती संताजी घोरपडे, मंजुषा प्रकाशन, कोल्हापूर पृ. ४५

२ आपटे द. वि. , दिवकर स. म. (संपा) जेधे शकावली शिवचरित्र प्रदीप, भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे, १९२५ पृ. ३६

३ सरदेसाई गो. स. (संपा) " पेशवा दप्तर खंड ३१ पुणे, पृ. ६२

४ आपटे द. वि. , दिवेकर स. म. जेधे शकावली पृ. ३८

५ सरदेसाई गो. स. मराठा रियासत खंड २ पाप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९ पृ.१५३

६ पगडी सेतुमाधवराव (संपा) मोगल आणि मराठे , भीमसेनकृत तारिघे दिल्कुशा, पुणे १९६३ पृ. १२८

७ कुळकर्णी अ. रा. , खरे ग. ह. – ' मराठ्यांचा इतिहास खंड १ – महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती CONTINENTAL PUBLICATION 1984 पृ. ४२४

८ पवार जयसिंगराव – सेनापती संताजी घोरपडे पृ. ११२

९ पगडी – मोगल आणि मराठे पृ. १३१

१० पवार – सेनापती संताजी घोरपडे पृ. ११३

११ पगडी – मोगल आणि मराठे पृ. १३१

१२ पगडी – मराठे व औरंगजेब – पुणे १९६३ पृ. ७१

१३ मावजी व पारसनीस (संपा) सनदापत्रे, लेखांक २३ पुणे १९९३ पृ. १७७

१४ आपटे, दिवेकर – जेधे शकावली पृ. ३८

१५ पवार – सेनापती संताजी घोरपडे पृ. ११४, ११५

१६ कित्ता पृ. ११५

१७ सरदेसाई – पेशवे दप्तर पृ. ६२

१८ सरदेसाई – मराठा रियासत खंड २, पृ. २३७

१९ आपटे, दिवेकर – जेधे शकावली पृ. ३९

२० पगडी – ' मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध ( तारीखे खाफीखान ) पुणे पृ. ३८

२१ पगडी – मराठे व औरंगजेब – पुणे १९६३ पृ. ७२

२२ सरदेसाई – मराठा रियासत खंड १ – पृ. ८३

२३ पवार – सरसेनापती संताजी घोरपडे पृ. १३८

२४ कित्ता पृ. १३९

२५ कित्ता पृ. १३९

२६ पगडी – ' मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध ( तारीखे खाफीखान ) पुणे पृ. ३८, ३९